# दलित साहित्यातील कथा : सामाजिक भान

**प्रा .अरुण डी मोरे**
संशोधक विद्यार्थी
क.ब.चौ.उ.म.वि .जळगांव
मराठी विभाग
पंकज कला महाविद्यालय,चोपडा जि.जळगावं
मो .नं .8390116399
इमेल –morearun12@gmail.com

**प्रा .डॉ के .के .आहिरे**
मार्गदर्शक,
कला शास्त्र व पी.ओ .नाहाटा
वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाला शिका संघटीत व्हा आणि संघर्ष करा .हा मुलमंत्र दिला आणि दलित समाज शिकू लागला .शिकल्यानंतर त्यांना आपल्या समाजाच्या व्यथा वेदना समजू लागल्या . आणि दलित कथाकारांनी ह्याच व्यथा वेदना कथेच्या स्वरुपातुन जिवंतपणे मांडल्या आहेत . खरेतर या मागे डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या मुक्तीसंग्रमाबरोबरच दलित कथेचा जन्म झाला आहे . तरी दलित कथेचा आरंभ हा 1960 नंतरच मानला जातो. कारण 1960 च्या अगोदरची दलित कथाही दलित जीवनाचे चित्रण करणारी कथा असली तरी ती प्राधान्याने जनजागरणाच्या हेतूने प्रभावित झालेली आहे .दलित कथाही इतिहासाची जाण आणि वर्तमानालाचे भान राखणारी कथा आहे . अस्पृश्यता ही कर्माचे फळ नियतीचा ठेवा किंवा नशिबाचा खेळ नसून ती धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक कारणांचे फलित आहे . ही जाणीव होऊन दलितकथा मार्गक्रमण करीत होती.

डाँ . आंबेडकरांचे क्रांतीगर्भ तत्वज्ञान दलित कथेचा मूलमंत्र बनला आहे .डाँ . आंबेडकरांचे विचार या कथेने जनमाणसात पेरले आहे . अंधश्रध्दा व अनिष्टरुढींचे दलित वर्गाने मोठया प्रमाणात त्याग केला . यामुळे एकंदर सामाजिक जीवनात बऱ्याच प्रमाणात परिवर्तन घडू लागले . दलित साहित्य किंवा दलित कथा हे एकटया लेखकाचे अनुभव नव्हते .तर हे कथाकार ज्या जातीत, समाजात वाढले त्या जातीची, समाजाची कथा आहे . दलितत्व ही जगाच्या पाठीवरील अतिशय वेदनादायक जाणीव आहे . दलित कथा या व्यवस्थेचा विध्वंस करण्यास सिध्द झाली आहे . हे आपणास विसरुन चालणार नाही . या अंगाने आपणास दलित कथेचा विचार करावा लागतो . कारण दलितताचे जीवन किती हीन असहाय असते हे अनुभवण्यासाठी ‘जावे त्याच्या वंशा’ असेच म्हणावे लागेल.

दलित साहित्यातील कथासंग्रह नव्या जाणिवांच्या व जीवन वास्तवाचा अविष्कार आहे .दलित कथा वेगवेगळे विषय व आशय घेऊन आपल्यासमोर येत आहे .एकविसाव्या शतकातील दलित समाजाच्या जीवनानुभवाचे त्या प्रतिनिधित्व करतात .असेच आपणास म्हणावे लागेल. एकविसाव्या शतकाच्या प्रारंभी भारत नवी पाऊले उचलत असला व 2020 साली तो जागतिक स्तरावरील महाशक्ती होणार असला तरीही दलित बहुजनासमोरील समस्या आजही जुन्याच आहेत. बदलत्या जगात एकीकडे स्पर्धेची भाषा ऐकायला मिळते तर दुसरीकडे दलित समाज आजही प्रतिष्ठेच्या जगण्यासाठी धडपडत आहे .संपूर्ण समाजाकडून होणारी उपेक्षा तर त्याच्या नशिबी आहेच पण त्यांच्यातील पांढरपेशी वर्गानेही त्याच्याकडे पाठ फिरवली आहे .म्हणून आजही दलित समाजापुढे जातीचे भयानक वास्तव आहे .समाजातील अज्ञान, बेकारी, गरीबी, व्यसनाधिनता अश्या अनेक समस्या उभ्या आहेत.

आजचा दलित कथाकार दलितांच्या जीवनवास्तवाला सामोरा जाऊन आपले जीवनानुभव रेखाटतो आहे .व समतेची नवी पहाट पाहण्याची तयारी करतो आहे हे ‘धम्मक्रांती’ कथासंग्रहातील कथा वाचून लक्ष्यात येते. वस्ती, बाटलेली आई, बाप, भुयार, अंगुलीमाल, काषायवस्त्र, धम्मदीक्षा, शांतामाय, दुष्टचक्र, मन्वंतर या कथा मधून जात वास्तवाचे चित्रण आपणास दिसते. स्वातंत्र्यानंतर दलितांच्या शिक्षणाची सोय झाली व त्यांना नोकरीत आरक्षण मिळाले पण हा सवर्णांचा द्वेषाचा विषय बनले .महार समाज हा आर.पी.आय च्या अनेक तुकडयात विभाजित झाला आहे . त्याचे चित्रण ‘समेट’ या नावाच्या कथेत अत्यंत मार्मिक ढंगाने केले आहे . जयराम खुने यांची ‘शांतामाय’ या कथेतही कथा बौध्द कार्य कार्यकर्त्यांच्या व लोकांच्या दांभिकतेवर घणाघाती हल्ला करणारी आहे .घरासाठी आयुष्यभर मर मर मरणारी शांतामाय आपल्या मुलाच्या लग्नाच्या निमित्ताने समाजाच्या दांभिकतेवर प्रहार करतांना दिसते .तिचा मुलगा बाळू आर.पी. आय. चा जिल्हा सचिव आहे .अनेक प्रयासाने ती आपल्या मुलाचे लग्न जमवते .लग्न समारंभ सुरु असतांना एका बेरकी पावण्याचं कुळवाच्या विडाकडे लक्ष जाते आणि तो हळूच विचारतो काय व सोयरं? लग्न जुन्या पध्दतीन हाय का ? त्यावेळी पाहुणे मंडळीत चलबिचल होते. प्रश्नार्थक चेहरे बघून शांतामाय जुन्या पध्दतीने लग्न करते तेव्हा तिला मारहाण होते . पण ती अट्टाहास सोडत नाही .एक कार्यकर्ता चळवळची भाषा करतो तेव्हा ‘शांतामाय’ उसळून म्हणते तुमची चळवळ मला कस्याला सिकवतात आ? मी बाबाच्या खांद्यावला खांदा दिऊन लडल्याल्या बापाची बिज्याकार हाय .शांतामाय बाबसाहेबांच्या चळवळीची साक्षीदार आहे .म्हणून आजच्या बाजार बुणग्या पुरुषांचा बुरख्या फाडते. दलित नेतृत्वाची व शिक्षित समाजाची कोडी प्रस्थापित समाजातील लोक तर करतातच पण आता चळवळीतील जुने जाणते पुढारीही नव्या नेतृत्वाची व कर्मचाऱ्यांची कोंडी करु लागले आहेत .

ही समस्या एकनाथ सोनवणे यांनी आपल्या ‘दुष्टचक्र’ या कथेत मांडली आहे .मग ते दलितांच्या शोषणाचे दुष्टचक्र निरंतर चालुच आहे .या कथेतील अधिकारी आपल्याच जातीतील निराधार मानकुला जागा मिळवून देण्याचा प्रयत्न करतात .पण ते त्याच वेळी कुलकर्णी हरेहर पाठकला ही जागा मिळवुन देण्याचा प्रयत्न करतो .मानकुला जागा देण्यास विरोध करतात इतर लोकांना दलित अधिकाऱ्याच्या अंगावर सोडतात .तेव्हा अधिकारी नानासाहेब नावाच्या जुन्या नेत्याकडे जातात तेव्हा नानासाहेब तो प्लॉट आपल्याच नावाने करण्याची शिफारस करतात .कथाही स्वाजातीतील वर्तनाचेही मुल्यमापन करीत असल्याचे दिसून येते .

आजची दलित कथा केवळ आजच्या युगाचे वास्तव चितारीत नाहीतर परिस्थिती बदलण्यासाठीती कटिबद्ध आहे .समाजातील अनास्था, लाचारी, अनादर याचे वास्तव चित्रण ती करतेच पण केवळ वस्तुस्थिती मांडून ती थांबत नाही तर ती ही परिस्थिती बदलण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे जाणवते प्रा .रविंद्र हडसनकरांची कथा सामाजिक ऐक्याचा एक यशस्वी प्रयोगच वाचका समोर ठेवीत आहे .यंकटी हा नायक आंबेडकराच्या विचाराने भारावून जातो .ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत, बौध्द, मातंग, मुस्लिम या सर्व मागासवर्गीयांना एकत्र करतो. पंचायती सत्ता दलितांच्या हातात देतो .गावकरी त्याची एकी फोडून काढण्याच्या प्रयत्न करतो . गावाने बहिष्कार टाकला तरी यंकटी खचुन जात नाही .गावात सुविधा व कर्ज मिळवून देतो .एक दिवस असा उजाळतो . सर्व गाव एकोप्याने वागायाला लागते .लेखक येथे दलित राज नितीची स्वतंत्र मुहर्त मेढ रोवत आहे .तु. लि . कांबळे याची ‘धम्मदीक्षा’ ही कथा धम्मक्रांतीकडे घेवून जाणारी आहे .या कथेतील बजरंग भावकीच्या त्रासाला कंटाळून जातीय विषमतेला तिलांजली देण्यासाठी धर्मांतर करतो. रोटी बेटी व्यवहारात अडचणी येऊ नये म्हणून तो समूहाने धर्मांतर करण्यासाठी प्रयत्नशिल होतो .त्यासाठी मनाचे परिवर्तन होणे अंत्यत आवश्यक आहे .म्हणून तो बंजरंगचा राष्ट्रपाल होतो .आणि बुध्दाला शरण जातो .

किशोर घोरपडेची ‘मन्वंतर’ ही कथेत लेखकाने समतेच्या चळवळीतील शेवटचे पर्व म्हणजे धम्मचक्र प्रवर्तन मानले आहे .त्यांची लेखणी आजही नव्या वाटा शोधत आहे .यासाठी त्यांनी अडीच हजार वर्षाचा मानवाच्या गुलामीचा इतिहास मांडला आहे .14 ऑक्टोबर 1956 हे नवे युगांतर आहे .धर्मांतराच्या घटनेने समतेचे नवे युग अवतरले आहे .स्वत:ला बौध्दाचार्य म्हणून घेणारे लोक किती अनीतीने वागतात याचे चित्रण प्रा .आत्माराम गोडबोले यांच्या ‘काषायवस्त्र’ कथेत आले आहे . कथा आपल्याला अंत:र्मुख करते .आणि एक चिंता व्यापून राहते .बौध्दाचार्य पुरोहिताची जागा तर घेत नाहीना, काषायवस्त्र कथेतील आनंद तर कसे हे समाजातील लुट करतात .विवाह विधी लावण्याचे काम आपल्यालाच मिळावे यासाठी प्लानिंग करतात . लग्नविधी झाल्यावर वर व वधु दोंन्ही पक्षाकडुन धम्मदान म्हणून मोठी रक्कम घेतात .बौध्द महासभेचा सदस्य आहे, अर्धी रक्कम मुंबईला पाठवावी लागते .अशी धाप मारतो .तर कसे लेक्चरर आहे, तसेच अहंकारीसुध्दा आहे माझ्या सारखा दुसरा कोणी लग्नविधी लावणार नाहीहे सांगत फिरतात .भंते, विश्वबोधी यांचीनिंदा करतांना मागे पाहत नाही .लेखकाने अशा प्रवृत्तीचा आपल्या कथेत धिक्कार केला आहे .

दलित कथेचा भर हा विशेष करुन संवेदनशीलतेवर अधिक आहे .दलित माणूसहा कथेचा केंद्रबिंदू आहे . त्याने स्वीकारलेले जीवनमूल्यच त्याच्या संघर्षाचे मूळ आहे .यातून निर्माण होणारे कारुण्य विसंवाद, संघर्ष, द्वंद्व , चीड, व्देष, विद्रोह ह्या कथेत वेगळया स्वरुपात आले आहे .ही कथा एका परिघातून बाहेर पडून स्वतंत्र्य रस्ता शोधते आहे .दुसऱ्या बाजूला ती आक्रमकही बनते आहे .अनेकविध घटनांच्या प्रसंगाच्या माध्यमातून नवेरुप शोधते आहे .असे दिसते .दलित कथाही आज आशयाचा विचार करता वेगळी कथाठरते .हा आशय यापूर्वीच्या मराठी कथेत आलेला नाही .या आशयाला दलित लेखकाच्या जीवनाचा संदर्भ आहे .तो वास्तवात लिखित स्वरुपात व्यक्त झाला त्यापेक्षा तीव्र आहे .अभिव्यक्ती आणि आशय या दोन्ही बाबतीत ही कथा वेगळेपण दाखविते .आजची दलित कथाही नव्या समाज रचनेचे स्वप्न घेवून निघाली आहे . जातीय वैमनस्य चंगळवाद, हुंडापध्दती, हिंदूचे संस्कार, समाजातील वैरभाव, फुटीरवृत्ती, इ .गोष्टी जळत आहेत याचेही भान तिला आहे . आजची दलित कथा विद्रोही आहेच पण ती केवळ सवर्ण जातीयवाद्यांच्या विरोधातच विद्रोह करीत नाहीतर स्वजातीयांच्या जुन्या वागणूकीचाही विद्रोह करते .आजचा दलित लेखक एका व्यापक क्षितिजाकडे पाहत आहे . दलित कथातून जिवंत भाषा येते .अर्थ व्याप्ती संबंधी विचार करता येतो .शब्द, म्हणी, वाक्प्रचार हे त्यात येतात मराठी भाषेत न दिसणारे सामर्थ्य या दलित कथेत व्यक्त झाले आहे .

संदर्भ ग्रंथ:

1 योगीराज वाघमारे, के.व्ही.सरवदे -धम्मक्रांती -संपा, हर्ष प्रकाशन सोलापुर 2008
2 मेश्राम डॉ .योगेंद्र -दलित साहित्य उदग्म आणि विकास, श्री मंगेश प्रकाशन नागपुर
3 डाँ .छाया निकम -दलित कथा निर्मिती आणि समीक्षा
4 तु.लि.कांबळे -जळ -चेतश्री प्रकाशन, अमळनेर प्र.आ .1984
5 डाँ .प्रकाश खरात -दलित कथा उदगम आणि विकास, सुगावा प्रकाशन, पुणे
6 डाँ .म.सु.पगारे -दलितसाहित्याचा इतिहास प्रशांत पब्लीकेशन, जळगांव 2008
7. शंकराव खरात -दलित साहित्य प्ररणा व प्रवृत्ती -इनामदार बंधु प्रकाशन, पुणे
8. कांबळे तु.लि - .मांजराकाठचे माणसे -सुविचार प्रकाशन नागपुर प्र.आ.1985
9. प्रकाश मोगले -कावस -अभय प्रकाशन -नांदेड प्र.आ .1999
10. गोडबोले आत्माराम -संगर -डिंपल प्रकाशन, ठाणे
11. किशोर घोरपडे -घसमटणी -स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद